# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | **सध्दर्म : त्रैमासिक** |
| संचालक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| प्रकाशक | : | कर्नाटक प्रकाशन संस्था, मुंबई |
| प्रकाशन वर्ष | : | १९६८ |
| वर्ष | : | तिसरें |
| अंक | : | नववा |
| पृष्ठे | : | १६ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या “ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १०**

सद्धर्म प्रकाशन

# सद्धर्म

त्रै मा सि क

संचालक
गुंडोपंत हरिभक्त

वर्ष तिसरें
अंक नववा
पौष, १८८९
जानेवारी, १९६८
वार्षिक वर्गणी
एक रुपया
किरकोळ अंक
पंचवीस पैसे

## ह्या नवव्या अंकांत....

जन्मोत्सवांचें पुनरुज्जीवन १
सर्वी समान सर्वांना २
यक्षप्रश्न २
अतिथीची व्याख्या २
आनंददायी ऐश्वर्यशाली उत्सव ३
पावणेदोनचे सव्वादहा ९
उत्सवांचा खटाटोप १५
सेवेसी श्रुत होय १६
संक्रांतीला 'सद्धर्म' वांटा १६

## जन्मोत्सवांचें पुनरुज्जीवन

देवादिकांचे जन्मोत्सव आतां बंद पडत चालले आहेत. त्यांच्या जागीं आज आपण आपले स्वतःचेच जन्मदिन, लग्नदिन, षष्ठ्यब्दिपूर्तिदिन, इत्यादि समारंभ अहमहमिकेनें साजरे करीत आहोंत. साहजिकच आहे. आनंद का कोणाला नको असतो? अखेर मानव आनंदप्रिय आहे.

पण हे समारंभ सर्वस्वी व्यक्तिनिष्ठ असल्यानें त्यांत व्यक्तीचा गौरव हीच प्रमुख बाब असते. त्यामुळें निर्भेळ, आनंदाऐवजीं अहंकार, असूया, राग, लोभ, संकुचितता, इत्यादि दुर्विकारांनाच त्यांत वाव मिळतो.

ह्या समारंभांतून शिरलेली अहेरपद्धति सर्वांनाच तापदायक झालेली आहे. अशा स्थितींत त्या समारंभांपासून खरा निर्भेळ आनंद मिळणें कधींही शक्य नाहीं.

तो मिळविण्यासाठीं आपल्याला आपल्या जुन्या देवादिकांच्या जन्मोत्सवांचेंच पुनरुज्जीवन केलें पाहिजे.

'यतः ऐश्वर्यं भवति सः उत्सवः।' ज्यापासून ऐश्वर्य म्हणजे ईश्वरभाव निर्माण होतो तो उत्सव. (ईश्वरस्य भावः ऐश्वर्यम्।)

ईश्वरभावासारखें सर्वांनाच निर्भेळ आनंद देणारें जगांत दुसरें काय आहे बरें? उत्सवांपासूनच तो आनंद मिळूं शकतो.

पण त्यासाठीं संयम, शिस्त आणि परमेश्वराचें अधिष्ठान ह्या गोष्टीच उत्सवांत प्रामुख्यानें असल्या पाहिजेत. तरच त्यांपासून खरा निर्भेळ आनंद मिळेल.

# ‘सर्वी समान सर्वात्मा’

उद्धवा जे मूर्ति ज्या पढियंती। तेची त्यासि पूज्य मूर्ती। तुवांही अणुमात्र चित्तीं ॥ संदेह ये अर्थी न धरावा ॥ ३६४ ॥ विष्णु विरिंचि सविता जाण। शिव शक्ति कां गजवदन। या मूर्तीमाजी मी आपण। सर्वी समान सर्वात्मा ॥ ६५ ॥ सर्वप्रतिमांचें पूजन। करितां मज पूजा समान। भक्तांची जेथ प्रीति गहन। तिये आधीन मी परमात्मा ॥ ६६ ॥ जेवीं बाळकाचेनि मेळें। माता तदनुकूल खेळे। तेवीं भक्तप्रेमाचिये लीळें। त्यांचि कल्लोळें क्रीडिजे ॥ ६७ ॥ या सर्वभूतांच्या ठायीं। आणि अवतारादि लीलादेहीं। मी सर्वांशीं समान पाहीं। ये अर्थी नाहीं संदेहो ॥ ६८ ॥ उद्धवा मी नाहीं ऐसें। कोणीही ठिकाण रितें न दिसें। परी प्राण्याचें भाग्य कैसें। त्या मज विश्वासानें न भजती ॥ ६९ ॥ जो जेथ मज भजों बैसे। त्या मी तेथ तैसाचि असें। हें उपासनाकांड विशेषें। गुप्त अनायासें प्रकाशिलें ॥ ७० ॥ उपासनाकांडींचा निर्वाहो। मी सर्वाभूतीं देवाधिदेवो। हा ज्यासि न कळे मुख्य भावो त्यासि मूर्तिनिर्वाहो बोलिला ॥ ७१ ॥ हो कां माझी प्रतिमामूर्ती। तेही मी चिदात्मा निश्चितीं। तेथ करितां भावें भक्ती। भक्त उद्धरती उद्धवा ॥ ३७२ ॥

—एकनाथी भागवत, अध्याय २७

उद्धवा, ज्याला जी मूर्ति आवडली असेल, तिचीच त्यानें पूजा करावी. त्याबद्दल मनांत मुळींही संशय बाळगूं नकोस. ३६४. विष्णु, ब्रह्मदेव, सूर्य, शंकर, देवी, किंवा गणपति ह्यांपैकीं कोणत्याही मूर्तीत सर्वात्मा असा जो मी, तो आहेंच. ६५. कोणत्याही प्रतिमेचें पूजन केलें, तरी माझ्या दृष्टीनें तें सारखेंच आहे. ज्या मूर्तीत भक्ताचें गाढ प्रेम असतें, त्या मूर्तीच्या मी परमात्मा आधीन असतो. ६६. आई ज्याप्रमाणें मुलाच्या कलानें त्याच्याशीं खेळते, त्याप्रमाणें प्रेमळ भक्तांच्या लीलांनुसार, मीही त्यांच्याशीं माझ्या चित्लहरींनें क्रीडा करीत असतो. ६७. सर्व भूतांच्या ठिकाणीं आणि लीलेनें घेतलेल्या अवतारांच्या ठायीं, मी सारखाच आहें, ह्यांत मुळींही संदेह नाहीं. ६८. उद्धवा, मी नाहीं, असें रितें ठिकाणच नाहीं. पण प्राण्यांचें दुर्दैव असें, कीं त्या गोष्टीवर विश्वास ठेवून ते माझी भक्ति करीत नाहींत. ६९. जो जेथें माझें भजन करण्यासाठीं बसतो, तेथें मी त्याच्या मनीं असेन तसाच त्याला दिसतों. हें उपासना-मार्गांचें रहस्य येथें अनायासें प्रकट केलें ७०. मी देवाधिदेव सर्वाभूतीं आहें, हें उपासनाकांडाचें रहस्य होय. पण ही गोष्ट ज्याला कळत नाहीं, त्याच्यासाठीं मीं मूर्तिपूजेचा पर्याय सांगितला. ७१. माझी प्रतिमा, मूर्ति कां असेना, तीसुद्धा चिदात्मरूप मीच आहें. उद्धवा, तिची अंतःकरणपूर्वक भक्ति केल्यास, भक्तांचा उद्धार होतो. ३७२.

## यक्षप्रश्न

Liberty ह्या अर्थानें स्वातंत्र्य अथवा स्वतंत्र हा शब्द इंग्रजी आमदानीपूर्वीच्या आपल्या वाङ्मयांत (संस्कृत, पाली वा मराठी) कोठें आलेला आहे का? कोणाला आढळला असल्यास अवश्य कळवावें.

## अतिथीची व्याख्या

एकरात्रं तु निवसन्नतिथिर्ब्राह्मणः स्मृतः।

परक्याच्या घरीं केवळ एक रात्र राहाणारा जो ब्राह्मण तो अतिथि होय.—मनु, ३-१०२.

ही मनूची अतिथीची व्याख्या आज-कालच्या पाहुण्यांनीं ध्यानांत घ्यावी.

# आनंददायी, ऐश्वर्यशाली उत्सव

मनुष्य जात्या आनंदप्रिय आहे. जीवनांतील दैनंदिन कटकटी बाजूला ठेवून कांहीं काळ तरी निर्मळ आनंदांत घालवावा, असें त्याला साहजिकच वाटत असतें. तसा आनंद मिळवण्याचें एक सुलभ आणि सर्वांच्या आटोक्यांतील साधन म्हणजे आपले उत्सव होत.

पृथ्वीतलावरील सर्व देशांत फार प्राचीन कालापासून कोणत्या ना कोणत्या प्रकारचे उत्सव अस्तित्वांत असल्याचें इतिहासावरून दिसून येतें. त्यांत ऋतूंना अनुलक्षून साजरे केलेले उत्सव सर्व देशांतून आढळून येतात. वसंतोत्सव साजरा केला जात नाहीं, असा तर एकही देश नसेल. सिलोनमधील 'आवारुध' नांवाचा उत्सव, सयामांतील 'सोंक्रग', तिबेटांतील 'कामदहन' हे सारे वसंतोत्सव[1] आहेत; एवढेंच नव्हे, तर आमचा ख्रिस्ती लोक साजरा करीत असलेला 'ईस्टर' हाही मुळांत वसंतोत्सवच होता. 'ईस्टर' हा शब्द 'ईओस्ट्रे' अगर 'ओस्टार' ह्या वसंतदेवतेच्या[2] नांवावरून बनलेला आहे.

वसंतोत्सव इतका सार्वत्रिक असावा, हें अगदीं साहजिक आहे. वसंताचें आगमन झालें, कीं सृष्टिदेवतेला बहर येतो. आणि प्रत्यक्ष सृष्टिदेवताच बहरली असतां, तिच्या लेकरांनींही तिला साथ देऊन आनंदानें नाचूं-बागडूं लागावें, त्यांत नवल तें काय? वसंतोत्सव हें मानवमात्राच्या आनंदप्रियतेचें एक द्योतक आहे.

मानवाची ही अभिजात आनंदप्रियता आपल्या प्राचीन ऋषींच्या ध्यानांत उत्तम प्रकारें आली होती. म्हणूनच यज्ञसंस्कृतीचा प्रसार सर्व प्रकारच्या लोकांत व्हावा म्हणून गायन-वादन, नृत्य-नाटक, खेळ-शर्यती, खान-पान, सभा-मिरवणुका, इत्यादि मनोरंजक गोष्टींची जोड त्यांनीं आपल्या यज्ञांना अत्यंत कुशलतेनें दिली होती.[3]

यज्ञसंस्कृति एके काळीं जोरानें प्रसार पावली त्याचें कारण, यज्ञसंस्थेची वाट करणाऱ्या ऋषींचें जीवन त्यागमय होतें, हें तर आहेच; पण त्याबरोबरच वर सांगितल्या-प्रमाणें, मनोरंजक गोष्टींना आपल्या यज्ञांत स्थान देऊन मानवाच्या अभिजात आनंद-प्रियतेला त्यांनीं योग्य तो वाव दिला होता, हेंही आहे. प्राचीन काळचे भिन्न भिन्न सोमयाग म्हणजे तत्कालीन उत्सवच होते.[4]

पुढील काळांत यज्ञसंस्थेला विकृतावस्था प्राप्त होऊन, अग्नि हा 'हव्यवाह' न राहातां, स्वतःच परमेश्वर बनला.[5] अशा स्थितींत उपनिषद्कारांनीं व नारायणीय अथवा सात्वतपंथीयांनीं यज्ञसंस्थेविरुद्ध बंड पुकारून आपआपल्या परीनें तिला नामोहरम केलें व नंतर गौतमबुद्धानें तिच्यावर अखेरचा घाव घातला, तेव्हां ती नष्टप्राय झाली व तिच्या अनुषंगानें निर्माण झालेले यज्ञस्वरूपी उत्सवही बंद पडले.

बुद्धानें यज्ञाऐवजीं, पौर्णिमा व अमावास्या ह्या दोन दिवशीं, तद्वत् दोन्ही

१. H. Kerne, *Manual of Indian Buddhism*, p. 101.

२. ज्ञानकोश, (ई) ५९.

३. ज्ञानकोश, प्रस्तावना खंड, भाग २, पृष्ठ ७८–७९, १२२–२३, २११–१२.

४. ज्ञानकोश, (४) ४७.

५. 'यज्ञ एव परमेश्वरः' । म्हणजे यज्ञ हाच परमेश्वर आहे, हें पूर्वमीमांसकांचें बिरुद सुप्रसिद्ध आहे.

पक्षांतील अष्टमीच्या दिवशीं 'उपोसथ' पाळण्याची प्रथा सुरू केली. उपोसथाच्या प्रसंगीं बौद्धलोक उपवास करीत व निजण्या-बसण्याबाबत कडक निर्बंध पाळून तो दिवस एकत्र बसून बौद्धग्रंथांचें पठण करण्यांत घालवीत. शिवाय पावसाळ्याच्या अखेरचे दिवस ते 'पवारणा' म्हणून साजरा करीत. त्या दिवशीं सर्व भिक्षु एकत्र जमून आपल्या दंडांचा व अडी-अडचणींचा मोकळेपणानें विचार करीत व नंतर गृहस्थ लोक भोजनास बोलावून त्यांना वस्त्र-प्रावरणें देत व त्यांची मिरवणूक काढीत.[६]

जीवन दुःखमय आहे आणि तृष्णा हें त्या दुःखाचें मूळ असल्यामुळें तिचा क्षय करणें हेंच जीविताचें ध्येय असलें पाहिजे, अशी बुद्धाची शिकवण होती. त्यामुळें भिक्षूंनीं कोणत्याही प्रकारच्या करमणुकीच्या कार्यक्रमांत भाग घेतां कामा नये, असा त्याचा दंडक होता.[७] म्हणून बौद्धांच्या समारंभांत अगर मिरवणुकींत नृत्य-नाट्य-गायनादि करमणुकीचे प्रकार मुळींही नसत. बौद्धानुयायांत मानवाच्या अभिजात आनंदप्रियतेला सुतराम् अवसर नव्हता.

नंतरच्या काळांत नास्तिक व पाखंडी लोकांच्या तर्कटांपायी लोक भ्रांत-चित्त बनले,[८] श्रद्धास्थानें डासळलीं आणि कर्तव्या-कर्तव्याची जाणीव लोपल्यामुळें, समाज-व्यवस्था मुळासकटच कोलमडून पडते कीं काय, असा समय येऊन, जनमनांत नैराश्य पसरलें व लोक जीवनाविषयीं उदासीन बनले, हें तत्कालीन इतिहासावरून प्रसिद्धच आहे.

६. H. Kerne, *Ibid.*, p. 100.
७. H. Kerne, *Ibid.*, p. 70.
८. 'वैनाशिकैः सर्वो लोकः आकुलीक्रियते ।' —सूत्रभाष्य, २-२-२७.

तशा परिस्थितींत "बाबांनो, घाबरूं नका. पृथ्वीवर जेव्हां जेव्हां एखादें भयंकर अरिष्ट कोसळतें, तेव्हां तेव्हां परमेश्वर कोणत्या ना कोणत्या रूपानें अवतीर्ण होऊन तिची मुक्तता करीत असतो," असा दिलासा देऊन, समाजपुरुषाच्या मनांत आशा आणि भविष्यकालाविषयींचा विश्वास निर्माण करण्यासाठीं वेगवेगळ्या अवतारकथा रचण्यास पुराणकारांनीं सुरुवात केली.

अवतारांची कल्पना प्राचीन कालापासून भारतांत रूढ होतीच.[९] व्यासमहर्षींनीं महाभारतांत तिला निश्चित स्वरूप देऊन,[१०] भगवद्गीतेंतील '...संभवामि युगे युगे'। ह्या वचनानें तिच्यावर भगवंताच्या नांवाचें शिक्कामोर्तबही केलेलें होतें.[११] त्यामुळें पुराणकारांच्या ह्या उद्योगांत लोकांस अपरिचित असें कांहींच नव्हतें.

पुराणकारांचा विशेष भर विष्णूनें वेळोवेळीं घेतलेल्या अवतारांवर, विशेषतः दशावतारांच्या कल्पनेवर होता. पण भारतांत दुर्गेची पूजा प्राचीन काळापासून रूढ आणि लोकप्रिय झालेली होती.[१२] तें ध्यानांत आणून, राक्षसांचा संहार करण्यासाठीं दुर्गेनेंही वारंवार अवतार घेतलेले आहेत, असें सांगणाऱ्या देवीमाहात्म्याच्याही कथा त्यांनीं रचल्या.

९. शतपथ ब्राह्मण, ७.५,१,५; ४.१,२,१.
१०. 'हंसः कूर्मश्च मत्स्यश्च प्रादुर्भावा: द्विजोत्तम। वराहो नारसिंहश्च वामनो राम एव च ॥ रामो दाशरथिश्चैव सात्वतो कल्किरेव च।' —महाभारत, शांतिपर्व, अध्याय ३३९.
११. भगवद्गीता, अध्याय ४, श्लोक ८.
१२. महाभारत, भीष्मपर्व, अध्याय २३; विराटपर्व, अध्याय ६.

पण अवतारी पुरुषांच्या अथवा देवींच्या नुसत्या कथा रचून पुराणकारांचें उद्दिष्ट साध्य होण्यासारखें नव्हतें. हवालदिल बनलेल्या तत्कालीन लोकांच्या अंतःकरणांत आशा निर्माण करून त्यांना प्रवृत्तिमार्गावर आणण्यासाठीं त्या कथा लोकांच्या प्रत्यक्ष जीवनाशीं भिडविणें अत्यंत निकडीचें होतें.

त्यासाठीं पुराणकारांनीं आपल्या प्राचीन इतिहासाकडे धाव घेतली. यज्ञसंस्कृतीच्या पुरस्कर्त्यांनीं आपली यज्ञसंस्था समाजाच्या सर्व थरांतील लोकांपर्यंत जाऊन पोंचावी म्हणून आपले यज्ञ-समारंभ आकर्षक बनविले होते व त्यांना नाट्य, नृत्य, गायन-वादनादि जनरंजन करणाऱ्या प्रकारांची जोड दिली होती. ही गोष्ट ध्यानांत घेऊन, पुराणकारांनीं अवतारकल्पना जनमनांत बद्धमूल करण्यासाठीं अवतारी पुरुषांचे जन्मदिन साजरे करण्याचें निश्चित केलें आणि त्यानिमित्त करायचे आकर्षक असे पूजा-समारंभ निर्माण करून, त्या समारंभांना नाट्य, नृत्य, गायन-वादनादि मनोरंजक प्रकारांची जोड दिली. ह्या पूजा-समारंभांत मानवाच्या अभिजात आनंदप्रियतेला भरपूर वाव दिलेला असल्याकारणानें ते लोकप्रिय होऊन, सर्वत्र साजरे करण्यांत येऊं लागले.

उत्सव (उत् + सु) हा शब्द, उत् हा उपसर्ग व सु हा धातु, ह्यांच्या संयोगानें बनलेला आहे. 'उत्' म्हणजे आधिक्यानें व 'सु' म्हणजे ऐश्वर्य देणें.[13] ऐश्वर्य म्हणजे ईश्वराचा भाव अथवा ईश्वरत्व. (ईश्वरस्य भावः ऐश्वर्यम्।)

१३. 'षु प्रसवैश्वर्ययोः ।—पाणिनी, १ प.
'यतः ऐश्वर्यं भवति सः उत्सवः।'
—अमर, १–८–३८, रामाश्रमी.

'यतः ऐश्वर्यं भवति सः उत्सवः।' म्हणजे ज्यापासून ऐश्वर्य म्हणजे ईश्वराचा भाव अतएव ईश्वरत्व निर्माण होतें, तो उत्सव होय.

अवतारी पुरुषांच्या जन्मदिनांनिमित्त पुराणकारांनीं निर्माण केलेले वरील पूजासमारंभ, ते साजरे करणाऱ्यांना निर्मळ आनंदाची प्राप्ति करून देऊन त्यांच्या ठायीं ईश्वराचा भाव अतएव ईश्वरत्व बुद्धिगत करण्यास समर्थ असल्याकारणानें, त्या समारंभांना पुराणकारांनीं दिलेलें उत्सव हें अभिधान अगदीं सार्थ आहे.

श्रीकृष्णजन्म, रामनवमी व दुर्गोत्सव अथवा नवरात्र हे त्या उत्सवांपैकीं प्रमुख होत. ते कसे साजरे करावेत ह्याची साद्यंत माहिती पुराणकारांनीं आपल्या ग्रंथांतून दिली आहे. त्याची कल्पना श्रीकृष्णजन्मोत्सवाच्या थोडक्यांत दिलेल्या पुढील वर्णनावरून येईल.[14]

श्रीकृष्णजन्म श्रावण कृष्ण अष्टमीच्या मध्यरात्रीं साजरा करावा. आदल्या दिवशीं एकभुक्त राहून, उत्सव करणारानें अष्टमीला उपवास करावा व व्रतस्थ असावें.[15] सकाळीं

१४. व्रतराज, कानपूर प्रकाशन, पृ. १८२-१८५
१५. पतित–पाखंडी–नास्तिकादिसंभाषणानृत–
द्यूतादिकमुपवासदिने वर्जनीयम् ॥
—हेमाद्रि, व्रतखंड, पृष्ठ १००८

पापाचरणी, पाखंडी, नास्तिक, इत्यादींशीं संभाषण, असत्य भाषण व द्यूत ह्या गोष्टी उपवासाच्या दिवशीं वर्ज्य कराव्यात.

उपवासः प्रणश्येत दिवास्वापाच्च मैथुनात् ।
—व्रतराज, पृष्ठ ७

दिवसा झोप आणि मैथुन ह्या गोष्टी केल्यानें उपवासाचें पुण्य नाहीसें होतें.

व्रतेष्वेतेषु सर्वेषु ब्रह्मचर्यं विधीयते ।
—नारदीय पुराण, ११०.४८

सर्व व्रतांमध्यें ब्रह्मचर्य पाळावें.

नित्यकर्म आटोपल्यावर, भरलेलें पाण्याचें भांडें घेऊन त्यांत फुलें, अक्षता, वगैरे टाकाव्या व भांड्यांतील पाणी हातावर सोडून उत्सवाचा संकल्प करावा. संकल्प करतांना वासुदेवाच्या स्तुतिपर मंत्र म्हणावेत.

नंतर देवकीच्या पुत्राचा आज जन्मदिन आहे असें मनांत म्हणत, उत्सवाच्या जागीं एक प्रसूतिगृह तयार करावें. त्यांत पाण्यानें भरलेले कलश ठेवावेत. आंब्याचे डहाळे, फुलांचे हार, तोरणें, इत्यादिकांनीं त्याला शोभा आणावी. आणि तेथें अगरू व धूप घालावा. आंत सठी व इतर मंगलदायक वस्तु ठेवण्यास विसरूं नये.

आजूबाजूंच्या भितींवरून देव, गंधर्व, वगैरे हात जोडून उभे आहेत अशीं चित्रें काढावीं. तसेंच हातांत नंगी तलवार घेतलेला वसुदेव व देवकी, नंद, यशोदा, कंसाचे पहारेकरी, यमुनेचा डोह, त्यांतील कालियासर्प, गोपगोपी, इत्यादींची दृश्यें बनवून उत्सवाच्या जागीं श्रीकृष्णावताराच्या काळचें वातावरण निर्माण करावें.

सर्व आरास केल्यावर प्रसूतिगृहांत पांढरीं शुभ्र वस्त्रें घातलेली शय्या ठेवावी व तिच्या सभोंवार स्वच्छ पडदे सोडावेत.

दोन प्रहरीं उत्सव करणारानें अंगाला तीळ, वगैरे लावून, शक्य असल्यास नदींत स्नान करावें. रात्रीं श्रीकृष्णाच्या प्रतिमेची उत्सवाच्या जागीं समंत्रक प्राणप्रतिष्ठा करून तिची षोडशोपचार पूजा करावी आणि आतां लवकरच देवकी श्रीकृष्णाला जन्म देत आहे असें ध्यान करीत, मंत्र म्हणावेत. लक्ष्मी, वसुदेव, देवकी, नंद, यशोदा, बळदेव, चंडिका, ह्यांचीही समंत्रक पूजा करावी व धूपदीप-आणि नैवेद्य अर्पण करावा.

बालकाचा आतां जन्म झालेला आहे, तेव्हां त्याचें जातकर्म, नालच्छेदन, सठीपूजा, नामकरण, वगैरे समारंभ प्रतीकरूपानें करावेत. चंद्रोदयानंतर अथवा मध्यरात्र उलटतांच रोहिणीसह चंद्राला अर्घ्य अर्पण करावें व वासुदेवाला साष्टांग नमस्कार घालून स्तुतीनें आळवावें. उरलेली रात्र आपले आप्तेष्ट, स्नेही-सोबती, शेजारी-पाजारी व भृत्य-सेवक ह्यांसमवेत श्रीकृष्णपरमात्म्याच्या कथा ऐकण्यांत व नृत्य-नाट्य-गायन-वादन, इत्यादिकांत भाग घेण्यांत आनंदानें घालवावी.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं नित्यकर्म झाल्यावर प्राणप्रतिष्ठा केलेल्या मूर्तीची पूजा करावी आणि उपाध्यायांना भोजन, वगैरे घालून, भगवंताची प्रार्थना करीत. ती मूर्ति त्यांना अर्पण करावी. नंतर गोरगरिबांना व आंधळ्या-पांगळ्यांना अन्न देऊन आपण पारणें करावें.

वरील माहिती वाचून पुराणकारांनीं निर्माण केलेल्या एकंदर उत्सवांची सर्वसाधारणपणें कल्पना येईल.

पुराणकारांनीं उत्सव करणाराला उत्सवाच्या दिवशीं उपवास करण्यास व अतस्थ राहाण्यास सांगितलें आहे. त्यावरून ह्या उत्सवांना संयमाची भरभक्कम बैठक''[१६]

---

१६. सुमारें पन्नास वर्षांपूर्वी सिंधुनदी-पलीकडील डेरा गाझीखान ह्या गांवीं आमच्या एका मित्राला रामलीलेच्या उत्सवाची मिरवणूक पाहाण्याचा योग आला होता. उत्सवाच्या मिरवणुकींत राम, सीता, लक्ष्मण, हनुमान, इत्यादि देवांच्या भूमिका घेणाऱ्या मुलांच्या आईबापांवर उपवास करून अतस्थ राहाण्याचा कडक निर्बंध असतो, असें आमच्या मित्राला उत्सवाच्या कार्यकर्त्यांनी त्या वेळीं सांगितलें होतें, तें ध्यानांत घेण्यासारखें आहे.

आहे, हें ध्यानांत येईल. तद्वत् त्या प्रसंगीं करण्याच्या पूजाविधींची एकंदर उभारणी पाहिली असतां, हे उत्सव साजरे करण्यांत कडक शिस्त विहीत आहे, हेंही ध्यानांत येईल.

संयम आणि शिस्त यांवर ह्या उत्सवांत अत्यंत भर दिलेला असल्याकारणानें, त्या प्रसंगीं होणाऱ्या नृत्य, नाट्य, गायन-वादनादि ललित कार्यक्रमांच्या वेळीं कोणत्याही प्रकारच्या अशिष्ट वर्तनाला थारा मिळणें शक्य नव्हतें.

कृष्णजन्माच्या वरील हकिकतींत उत्सवाच्या जागीं देव-गंधर्वांचीं चित्रें चितारण्याचा व कृष्णचरित्रांतील वेगवेगळ्या प्रसंगांचीं दृश्यें दर्शविण्याचा उल्लेख आहे. त्यावरून पुराणकारांच्या कल्पकतेची साक्ष पटते. तसें करण्यांत पुराणकारांचा उद्देश उत्सवांत भाग घेणाऱ्या सर्वसामान्य लोकांस अवतारी पुरुषांच्या जीवनाशीं समरस करून त्या वातावरणांत प्राप्त होणारा निर्मळ आनंद मिळवून द्यावा व तद्वारें त्यांच्या मनांत ईश्वराचा भाव अतएव ईश्वरत्व दृढिंगत करावें हाच होता, हें उघड आहे.

पशुत्व हें मानवाच्या पांचवीला पूजलेलें आहे. त्यापासून त्याला पराङ्मुख करून त्याच्या ठायीं ईश्वरभावाची वाढ करणें, हें जें उत्सवांचें खरें उद्दिष्ट, तें साध्य करण्यास पुराणकारांनीं निर्माण केलेले वरील उत्सव समर्थ आहेत, असें वर केलेल्या त्यांच्या छाननीवरून कोणाच्याही ध्यानांत येईल.

हे उत्सव सर्व वर्णांच्या लोकांनीं करावे, एवढेंच नव्हे, तर श्रद्धा असल्यास, म्लेंच्छांनींही[१७] ते करायला हरकत नाहीं, असें पुराणकारांनीं आवर्जून सांगितलें. शिवाय त्या प्रसंगीं आपआपल्या प्राकृत भाषांतून[१८] कथा, वगैरे सांगण्यांत याव्यात, असेंही त्यांनीं आग्रहानें सांगितलें. त्यामुळें अर्थातच आबालवृद्ध सर्व जाती-जमातींचे[१९] लोक त्यांत उत्साहानें व खेळीमेळीनें भाग घेऊं लागले आणि त्यांचा प्रसार अल्प काळांतच आसेतुहिमाचल सर्व भारतभर झाला.

वरील विविध उत्सवांच्या प्रसारामुळें पुराणकारांच्या अवतारविषयक कथांचें लोण भारताच्या कोनाकोपऱ्यांत समाजाच्या सर्व थरांतील लोकांपावेतों जाऊन पोंचलें. परिणामीं, दशावतारांची कल्पना समाजांत बद्धमूल झाली व पृथ्वीवर जेव्हां जेव्हां एखादें भयंकर अरिष्ट कोसळतें, तेव्हां तेव्हां परमेश्वर कोणत्या ना कोणत्या रूपानें अवतीर्ण होऊन तिची त्यांतून मुक्तता करीत असतो, असा विश्वास जनमनांत दृढ होऊन, लोकांची आस्तिक्यबुद्धि जागृत झाली आणि जीवनाविषयीं निर्माण झालेली उदासीनता नाहींशी होऊन, जनमनांत आशेला स्थान मिळालें, एवढेंच नव्हे, तर पांगापांग झालेल्या तत्कालीन समाजांत ऐक्याची भावनाही[२०] ह्या उत्सवांनीं निर्माण केली.

---

१७. भतराज, पृष्ठ १८६, श्लोक १२.

१८. धर्मसिंधु, पृष्ठ ७०-७१.

१९. अजूनही रत्नागिरींतील भगवतीच्या उत्सवप्रसंगीं पालखीबरोबर अब्दागीर घेण्याचा मान एका मुसलमानाकडे आहे.

२०. गणेशोत्सवाला चालना देतांना लोकमान्य टिळकांनीं १८९४ सालीं पुढील विधान केलें आहे:

"कोणत्याही देवतेचें सर्वांनी एकनिष्ठपणें आराधन करणें यानेंच उपासकांच्या मनांस एक प्रकारचें वळण लागून त्यांच्यामध्यें उपासकबंधुत्वाची बुद्धि जागृत होते."

—लो. टिळकांचे केसरींतील लेख, भाग १, राजकीय खंड १, पृष्ठ ४८७.

पुराणकारांनीं निर्माण केलेले जन्माष्टमी, रामनवमी, दुर्गापूजा, वगैरे हे उत्सव सुरू झाल्याला किमान बाराशें-पंधराशें वर्षे झालीं. तरीही नंतरच्या काळांत ते अवघ्या भारतांत अव्याहतपणें चालू राहिले, ह्या एकाच गोष्टीवरून पुराणकारांना ह्या कार्यांत मिळालेल्या यशाचें मापन करतां येतें.

दुर्दैवेकरून शें-सव्वाशें वर्षे इंग्रजांनीं आपमतलबीपणाचें शिक्षण देऊन[२१] भारतीयांचा जो जाणूनबुजून बुद्धिभेद करविला, त्यापायीं सुशिक्षितांच्या मनांत ह्या उत्सवांविषयीं अनादर निर्माण झाला आणि त्यांनीं त्यांची उपेक्षा केली. त्यामुळें हे उत्सव सर्वस्वीं असमंजस लोकांच्या हातीं जाऊन त्यांचें मूळ सोज्ज्वळ स्वरूप नाहींसें होत गेलें आणि त्यांना विकृतावस्था प्राप्त झाली.

त्यांतच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर, संयम आणि शिस्त ह्यांचा अवघ्या भारतांत लोप झाल्यामुळें ह्या उत्सवांतही त्यांचा पूर्णपणें अभाव होऊन, आज त्यांना केवळ धांगड-धिंग्याचें स्वरूप प्राप्त झालेलें आहे. लोकमान्य टिळकांनीं मोठ्या आस्थेनें चालना दिलेल्या गणेशोत्सवाची दशाही आज काय झाली आहे, तें आपण पाहातच आहोंत.

आणि त्यांतच अखिल भारतांत साजरा केल्या जाणाऱ्या रामनवमीसारख्या उत्सवांच्या सुट्ट्याही आतां बंद केल्या जात आहेत! त्यावरून हे उत्सव लवकरच इतिहासजमा होतील, हें उघड आहे.

नास्तिक व पाखंडी लोकांच्या तर्कटांपायीं समाजाचा गाडा कोलमडून पडण्याची वेळ आली असतां, ज्या उत्सवांनीं लोकांच्या मनांत आस्तिक्यबुद्धि व आशा निर्माण करून, त्यांना प्रवृत्तिमार्गाला लावलें व समाजशकट पुन्हा सावरून धरला, एवढेंच नव्हे, तर ज्या उत्सवांनीं पांगापांग झालेल्या जातीजमातींना एकत्र आणून अवघ्या भारतांत एके काळीं ऐक्याची भावना निर्माण केली, त्याच आमच्या उत्सवांची आज स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आमच्याच हातून अशी वाट लागावी, ह्याला काय म्हणावें? दैवगति विचित्र आहे.

पण दैव फिरलें आणि पुराणकारांनीं अतिसमंजसपणें निर्माण केलेले अवतारी पुरुषांचे जन्मोत्सव बंद पडले, म्हणून मानवाची अभिजात आनंदप्रियता थोडीच गप्प रहाणार आहे? तिला योग्य तो अवसर न मिळेल, तर मानव सुचेल त्या भल्याबुऱ्या मार्गांनें आनंद मिळविण्याची धडपड करीत राहीलच.

तेव्हां अशा परिस्थितींत, मानवाच्या अभिजात आनंदप्रियतेला योग्य वाव मिळावा म्हणून बदललेल्या परिस्थित्यनुसार जुन्या उत्सवांचें पुनरुज्जीवन करणें या तशा प्रकारचे नवे उत्सव निर्माण करणें, आज अत्यंत अवश्य आहे.

पण तसें करतांना, उत्सवांना जर संयमाचा भरभक्कम पाया, शिस्तीची मजबूत चौकट आणि अथपासून इतिपर्यंत भगवंताचें अधिष्ठान असेल तरच त्या उत्सवांपासून निर्भेळ आनंद व ईश्वरत्व प्राप्त होईल.

२१. "It is my firm belief that if my plans of education are followed up, there will not be a single idolator among the respected classes of Bengal, thirty years after, and this will be effected without any efforts to proselytise."
—Macaulay's letter to his father, dated 12th October, 1826.

# पावणेदोनचे सव्वादहा

"या सुरेनबाबू, आज सकाळींच आलांत ?" असें म्हणत मीं सुरेनबाबूंसाठीं एक खुर्ची पुढें केली. बाबूजी आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें दोन्ही पाय वर घेऊन, मांडी घालून खुर्चीत बसले.

आमचे सुरेनबाबू म्हणजे कलकत्त्यांतील एक सुखवस्तु व्यक्ति होती. कोणाच्याही उपयोगी पडावें, हाच त्यांचा व्यवसाय-बँकेकडून ओव्हरड्राफ्ट मिळवून देण्यापासून, तो मुलीसाठीं एखाद्या स्थळाची खात्रीलायक माहिती आणून देण्यापर्यंत, कोणींही कांहीही काम त्यांना सांगावें. त्यांच्याकडून तें झालें नाहीं, असें सहसा कधीं व्हायचें नाहीं. आणि असें असूनही, सुरेनबाबू निर्लोभी होते. कोणाचेही ते मिंधे नसल्यामुळें त्यांना सर्वत्र मान मिळे. लोकांना ते हवेसे वाटत.

पण बाबूजींत एक मोठा दोष होता. तो म्हणजे फार बोलायची त्यांची खोड. त्यांनीं एकदा बोलायला सुरुवात केली, कीं मग फोनोची रेकॉर्ड मध्यें थांबायची म्हणून नाहीं. एकदा त्यांच्या एका मित्रानें त्यांना म्हटलें, "सुरेनबाबू, एक दिवस गप्प बसायला काय घ्याल ?" त्यावर सुरेनबाबूंनीं त्याला लगेच उलट प्रश्न केला, "बाबूजी, संबंध दिवस माझी बडबड ऐकण्यासाठीं काय घ्याल ?"

आणि असें म्हणून त्यांनीं झटकन् आपल्या टेबलाच्या खणांतून चेकबुक काढलें आणि त्या मित्राला म्हटलें, "हं. सांगा."

बिचाऱ्या मित्राला तोंडांत मारल्यासारखें झालें.

पण असे हे आमचे सुरेनबाबू आज अगदीं गप्प होते. म्हणून मीं त्यांना विचारलें,

"बाबूजी, तब्येत ठीक आहे ना ?"

त्यावर "क्या कहे, साहाब," असें म्हणत बाबूजींनीं हातांतील वर्तमानपत्र बाजूच्या टेबलावर आपटलें आणि खिशांतील रुमाल काढून एकदा तोंड पुसलें आणि बोलण्यास सुरुवात केली.

"क्या कहे, साहाब." अशी प्रस्तावना करून सुरेनबाबूंनीं बोलायला सुरुवात केली म्हणजे समजावें, कीं आज कांहीं तरी विशेष हकीकत ऐकायला मिळणार आहे. म्हणून मी मुकाट्यानें ऐकूं लागलों.

"तुम्हांला आमचे घनामलजी माहीत आहेत ना ?" बाबूजींनीं मला विचारलें.

"कोण ? कपडेवाले ना ?" मीं म्हटलें.

बाबूजींनीं उत्तर दिलें, "हां बराबर," आणि एक उसासा टाकीत, त्यांनीं हकीकत सांगायला सुरुवात केली.

ते म्हणाले, "गेल्या वर्षीची मंदी तुम्हांला ठाऊक आहेच. तेव्हां बाबूजींनीं खाकी कापड खरीदण्यास सुरुवात केली. अहमदाबाद, मुंबई, कानपूर, दिल्ली जिथें जिथें म्हणून खाकी कापड मिळालं, तें त्यांनीं खरीदलं. ह्या युद्धांत सोल्जरांसाठीं सरकारनें खाकीऐवजीं ऑलिव्ह रंगाच्या कापडाचे युनिफॉर्म केले असल्यामुळें खाकीला मुळींच उठाव नव्हता. तेव्हां घनामलजींची खरेदी पाहून लोकांनीं त्यांना पागलच म्हटलं. पण घनामलजींनीं त्याची पर्वा केली नाहीं. आपलीं तमाम गुदामं खाकीनें भरलीं. त्यासाठीं त्यांना बँकेकडून ओव्हरड्राफ्टही घ्यावे लागले. पण ते डरले नाहींत."

असें म्हणून बाबूजींनीं खिशांतून पानाची डबी काढून त्यांतील एक पान तोंडांत कोंबलें आणि ते पुढें म्हणाले,

"धनेमलजींनीं वर्षभर व्याज भरलीं. पण अखेर गळ्याशीं आलें, तेव्हांमात्र ते कपाळाला हात लावून बसले. एका वारांचीही विक्री नाहीं आणि व्याज तर चालू. तें भरतां भरतां त्यांच्या नाकीं नऊ आले.

"एक दिवस तर माझ्या गळां लागून ते मला म्हणाले, 'सुरेनबाबू, आतां मोरचूद खायचीच वेळ आली आहे. काय करूं ?'

"त्यांना धीर देतां, पुरे वाट झाली.

"पण बाबूजींचं तकदीर बेहत्तर आहे. गेल्या महिन्यांत त्यांच्या कालिंगपॉंगच्या दुकानीं एकाएकीं भुटिआ व्यापारी आले. जणूं टोळधाडच. त्यांनीं बाबूजींची सारी खाकी सपासप खरेदी केली."

"तर मग धनामलजींना भरपूर फायदा मिळाला असेल!" मी मध्येंच बोलायला सुरुवात केली.

पण मला लगेच थांबवून सुरेनबाबू म्हणाले, "साहाब, तोच तर किस्सा मी तुम्हांला सांगतो आहें. ऐका तरी."

बाबूजींना कोणी मध्यें बोललेलें आवडत नसे. मी मुकाट्यानें ऐकूं लागलों.

ते म्हणाले, "धनामलजींची खरेदी दीड ते पावणेदोन रुपये वाराची होती... आणि आतां..." डोळे मिचकावीत सुरेनबाबू पुढें म्हणाले, "धनामलजींनीं आठ रुपयांपासून विकायला सुरुवात केली, तें ते सव्वा दहा रुपयांपर्यंत गेले."

"अरे बापरे!" मी मध्येंच उद्गारलों. माझ्यानें राहवलें नाहीं.

पण बाबूजींनीं तिकडे दुर्लक्ष केलें. ते पुढें म्हणाले, "असं म्हणतात, कीं हें सारं कापड तिबेटांत जाऊन तिथून पुढें चायनांत जाणार आहे. भगवान जाणे, खरं काय आहे तें. पण आपल्याला त्याच्याशीं काय करायचं आहे!"

ही संधि साधून मीं म्हटलें, "खरं आहे, आपल्याला विक्रीशीं काम. पण धनामलजी जबरे खरे. फायदा घ्यायलासुद्धा छाती लागते."

माझ्या म्हणण्याचा रोख लक्षांत येऊन सुरेनबाबू म्हणाले, "होय साहेब, पण आमचे धनामलजी कांहीं तसे गळेकापू नाहीत. कुणीं भुटिआनें दादा-बाबा केलं, तर त्याला त्यांनी चार दोन आणे सोडलेही. पण राहूं द्या तें. पुढें ऐका."

सुरेनबाबूंची रेकॉर्ड सुरू झाली. ते म्हणाले, "कालिंगपॉंगला कापडाची विक्री सुरू झाली तेव्हांपासून, 'एकदा माझ्याबरोबर कालिंगपॉंगला तिथली मजा पाहायला चला' म्हणून धनामलजी माझ्या मागें होते. दर वेळेला तिथें जातांना मला ते 'बरोबर चला' म्हणून आग्रह करीत. पण कुठें त्या थंडी-वाऱ्यांत; म्हणून मीं तें टाळलं. अखेर गेल्या गुरुवारीं सकाळीं धनामलजी माझ्या घरीं आले आणि मला म्हणाले, 'सुरेनबाबू, आतां मी तुमचं ऐकणार नाहीं. उद्यां मी कालिंगपॉंगला जात आहें. तुम्ही माझ्याबरोबर आलंच पाहिजे.' आणि असं म्हणून त्यांनीं माझ्या पुढें एक फर्स्टक्लासचं तिकिट टाकलं आणि म्हणाले, 'हें पाहा, मीं तुमचं रिझर्व्हेशनही केलं आहे.' तेव्हां मग मला त्यांच्याबरोबर जाणं भागच पडलं."

डायरीतलें आणखी एक पान उलटीत बाबूजी पुढें म्हणाले, "आम्ही शनिवारीं सकाळीं कालिंपाँगला पोचलों. धनामलजींची राहायची जागा दुकानाच्या वरच आहे. तिथें आम्ही चार दिवस मजेंत राहिलों. थंडी फारशी नव्हती. भुटिआ लोक आतां परतले असल्यामुळें दुकानांत गर्दीही मुळीं नव्हती.

"धनामलजींनीं मुनिमाकडून दुकानचे सारे हिशेब समजून घेतले आणि ते त्याला म्हणाले, 'मुनीमजी, हिशेब तर सारे ठीक आहेत. वहींत जमा असलेले सारे रुपये तुम्हीं वेळोवेळीं बँकेंत भरले आहेत. आतां उरलेले वरचे अठरा लाख आहेत, ते मी माझ्याबरोबर घेऊन जाईन. उद्यां सकाळीं आम्ही निघणार आहोंत. रकम तयार ठेवा.'

"मुनीमजी 'जी' म्हणून आपल्या उद्योगाला लागले.

"दुसऱ्या दिवशीं सकाळीं नास्तापाणी आटोपून कलकत्त्याला जाण्याच्या तयारीनें आम्ही खालीं दुकानांत आलों. मुनीम आधींच तिथें येऊन बसलेला होता. त्याला धनामलजी म्हणाले, 'मुनीमजी, आम्ही निघालों. आणा पाहूं ती रकम.'

"मुनिमानें आंतल्या खोलींत जाऊन तिजोरी उघडली आणि पैशांची थैली आणून धनामलजींच्या पुढें ठेवून, आपण बाजूला अदबीनें उभा राहिला.

"थैली हातांत घेऊन धनामलजी मुनिमाला म्हणाले, 'ठीक १८ लाख आहेत ना?'

"मुनिमानें आतां हात जोडले होते. तो त्यांना चाचरत म्हणाला, 'हं-हं-मालिक, हे तेरा लाख आहेत.'

"धनामलजींनीं एकदम आश्चर्यानें विचारलें, 'तेरा लाखच कां? वरची रकम तर अठरा लाख आलेली आहे.'

"मुनिमानें आतां धनामलजींच्या पायांना हात लावले आणि अत्यंत थंडपणें तो त्यांना म्हणाला, 'धनि, पांच लाख मीं घेतले आहेत.'

"धनामलजी एकदम त्रासून त्याला म्हणाले, 'मीं घेतले? मीं घेतले म्हणजे काय?'

"मुनीम पुन्हा त्यांच्या पायांना हात लावीत थंडपणें म्हणाला, 'मालिक, माझ्या मुलाला त्याच्या शेठनीं कानपूरच्या दुकानांत भागीदारी देऊं केली आहे. त्यासाठीं मीं हे पांच लाख ठेवले आहेत.'

"धनामलजी चिडून म्हणाले, 'आणि मला विचारल्याशिवाय? चोर कुठला, मुकाट्यानें ते पैसे आण, नाहीं तर...'

"मुनिमानें हात जोडलेलेच होते. तो पूर्वीप्रमाणेंच थंडपणें म्हणाला, 'मालिक, आमण मला हवं तें म्हणूं शकता. मीं आपलं निमक खाल्लं आहे.'

"आतां मात्र धनामलजींचा पारा वर चढत गेला. ते दटावणीच्या स्वरांत मुनिमाला ओरडून म्हणाले, 'चोर तो चोर. आणि वर निमक खाल्ल्याच्या गोष्टी बोलतोस? तें कांहीं नाहीं. आत्तांच्या आत्तां मुकाट्यानें पैसे आणून पुढें ठेव. नाहींतर तुला पोलीसच्या हवालीं करतों.'

"आणि असं म्हणून त्यांनीं बाहेर उभ्या असलेल्या आपल्या दरवानाला हाक मारली आणि म्हटलें, 'राजकिशोर, जा, पोलिसांना घेऊन ये.'

"राजकिशोर बिचारा मुकाट्यानें बाहेर जाऊन उभा राहिला.

"मी चूपचाप सर्वकांहीं पाहात होतों.

"मुनीम दगडासारखा निश्चल उभा होता. तो आतां पूर्वीइतक्याच शांतपणानें धनामलजींना हात जोडून म्हणाला, 'मालिक, असे रागावूं नका. मी आपला नोकर, आपल्या आज्ञेबाहेर मी थोडाच जाईन? पण आपण मालक आहांत. मालकानें पुढें जायचं. नोकर मागोमाग आहेच...'

"आतां मात्र धनामलजींचा रागाचा पारा थरमॉमीटर फुटण्याइतका वर गेला. त्याचें सर्वांग थरथरां कांपत होतें. ते आवेगानें म्हणाले, 'चोर तो चोर, आणि हरामखोरा, वर मला अकल शिकवतोस?'

"आणि असं म्हणून संतापाच्या भरांत हातांतील पैशांची थैलीच ते मुनिमाच्या डोक्यांत घालणार, तोंच मीं एका हातानें धनामलजींचा हात धरला आणि दुसरा हात त्यांच्या पाठीवरून फिरवीत, त्यांना शांत करीत म्हणालों, 'धनामलजी, शांत व्हा. शांत व्हा. कुणावर हात उगारणं बरं नाहीं. मुनीम म्हणतो आहे, त्यांत तथ्य आहे. जरा सबुरीनें घ्या.'

"धनामलजींनीं थोडें शांत होऊन हातांतील थैली बाजूला ठेवली. तरी पण अजून संताप होताच. त्या भरांत ते मला म्हणाले, 'काय सुरेनबाबू, तुम्हीही ह्या चोराची तरफदारी करतां? आश्चर्य आहे. आज दुनियाच उलटलेली दिसते.'

"मीं धनामलजींचा हात चेपीत म्हटलें, 'बाबूजी, दुनिया कशाला उलटेल! पण मुनीमजीच्या बोलण्याचा अर्थ नीट लक्षांत घ्या. समजा, पोलिसांना तुम्ही इथें बोलावलंत आणि ही एवढी कॅश इथें कशी आली, असं त्यांनीं तुम्हांला विचारलं, तर काय उत्तर द्याल?'

"माझा सवाल ऐकतांच धनामलजी बर्फासारखे गार झाले. त्यांचं तोंड खर्रकन् उतरलं. पण दुसऱ्याच क्षणीं भानावर येऊन ते मुनिमाला म्हणाले, 'जा, घे ते पांच लाख. पण पुन्हा कधीं असं करूं नकोस.' आणि मग बाजूला ठेवलेली पैशांची थैली आपल्या हातानें उचलून ती त्या मुनिमाच्या हातांत देत ते त्याला म्हणाले, 'आंत जा, आणि माझ्या बिछान्यांत ही नीट बांधून ठेव.'

"हे म्हणत असतां धनामलजी आतां अगदीं शांत झाले होते. क्षणापूर्वीच फुरफुरणारे त्यांचे ओठ आतां घट्ट दाबलेले होते. त्यांच्या चर्येवरून मनांतून त्यांचा कांहींतरी निश्चय झालेला असावा असं दिसत होतं.

"मुनिमाच्या डोळ्यांतून घळघळा अश्रु वाहूं लागले होते. त्यानें धनामलजींच्या पायांवर डोकं ठेवलं आणि थैली घेऊन तो मुकाट्यानें आंतल्या खोलींत गेला.

"थोड्याच वेळांत मुनीम बिस्तरा घेऊन बाहेर आला आणि त्यानें तो राजकिशोरच्या स्वाधीन केला. मग आम्ही राजकिशोरसह कलकत्त्यास येण्यासाठीं तिथून निघालों.

"प्रवासांत धनामलजींनीं झाल्या प्रकाराबद्दल अवाक्षरही काढलं नाहीं.

"गाडी 'लेट' होती. कलकत्त्याला पोंचायला आम्हांला दोन वाजले. स्टेशनवर धनामलजींची मोटर आलीच होती. तिच्यांत बसतांना धनामलजी मला म्हणाले, 'सुरेनबाबू, प्रथम मी तुम्हांला घरीं सोडतों. उशीर झाला आहे. मग तिथून मी सरळ गद्दीवर जाईन.'

"धनामलजींजवळ असलेली जोखीम लक्षांत घेऊन मीं त्यांना म्हटलं, 'तसं नको धनामलजी. मी तुमच्याबरोबर गद्दीवरच येतों. तिथून मग तुम्ही आपल्या घरीं जातांना मला वाटेंत सोडा.'

"धनामलजी 'बरं' असं म्हणाले. त्यांना माझ्या बोलण्यानें समाधान झालेलं दिसलं. मग आम्ही सरळ धनामलजींच्या गद्दीवर आलो. राजकिशोर बिस्तरा घेऊन आमच्याबरोबरच होता.

"गद्दींत शिरतांच धनामलजी समोरा आलेल्या आपल्या मुलाला म्हणाले. 'मुरारी, पानाचंद कुठें आहे? त्याला बोलाव.'

"पानाचंद म्हणजे धनामलजींनीं कलकत्त्यास धंदा सुरू केला, तेव्हांपासूनचा त्यांचा जुना मुनीम. तो शेजारीं गुदामांत गेला होता. मुरारीनें त्याला बोलावून आणण्यासाठीं माणूस धाडला.

"इकडे राजकिशोरनें धनामलजींचा बिस्तरा गाडींतून आणून गद्दींत आंतल्या बाजूला नेला आणि त्यांतील पैशांची थैली काढून त्यानें ती बाहेर आणून धनामलजींच्या पुढें ठेवली.

"एवढ्यांत पानाचंदही तिथें आला. त्याला पाहून धनामलजी म्हणाले, 'मुनीमजी, ही थैली घ्या. त्यांत तेरा लाख आहेत. त्यांतले पांच लाख तुम्ही घ्या आणि बाकीचे आठ लाख आपल्या साऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या पगाराच्या हिश्यांप्रमाणें वांटून द्या. कुणालाही वगळूं नका.'

"धनामलजींचं भाषण ऐकून मुनीमच काय, पण तिथें असलेला प्रत्येक माणूस दगडाच्या पुतळ्याप्रमाणें स्तंभित झाला. धनामलजी काय करीत आहेत, तें क्षणभर माझ्याही ध्यानांत येईना.

"पण धनामलजींनीं कुणाला विचार करायला अवसरच दिला नाहीं. ते पुढें मुरारीला म्हणाले, 'बेटा, हा सारा व्यापार-धंदा तुझा तूं आतां सांभाळ. मी हृषीकेशला जातों.'

"आणि घड्याळाकडे पाहून ते पुढें म्हणाले, 'अजून तुफान मेलला दोन घंटे अवकाश आहे. तेवढ्यांत माझं इथलं काम आटपेल.'

"मग त्यांनीं बाजूलाच उभ्या असलेल्या आपल्या जगदीश टायपिस्टला खिशांतून पैसे काढून दिले व लगेच हावड्याला जाऊन हरिद्वारचं तिकीट काढून तुफान मेलमध्यें आपली जागा रिझर्व्ह करण्यास सांगितलं.

"जगदीश मुकाट्यानें पैसे घेऊन हावड्याला जायला निघाला.

"इकडे मुरारी, पानाचंद व गद्दींतले सारे कर्मचारी अजून एकमेकांकडे टकमक पाहातच उभे होते. धनामलजींचा स्वभाव सर्वांना ठाऊक होता. त्यांनीं एकदा एखादा निर्णय केला, कीं तो कधीं पालटायचा नाहीं. काळ्या दगडावरची रेघ. त्याबाबत त्यांच्यापुढें ब्र काढण्याचीही कुणाची छाती नसे.

"मी सर्व प्रकार शांतपणें पाहात होतों. आतां माझ्याकडे वळून धनामलजी म्हणाले, 'सुरेनबाबू, जाण्यापूर्वीं मुरारीला 'परप्रो' दिली पाहिजे. तर माझ्याबरोबर सॉलिसिटर चौधरीबाबूंच्या दफ्तरांत येतां का? तुम्हांला आज मी फार ताणत आहें.'

"धनामलजींच्या शेवटल्या वाक्याकडे दुर्लक्ष करीत मीं त्यांना म्हटलं, 'धनामलजी,

चला, जाऊं या आपण. पण थांबा, चौधरीबाबू दफ्तरांत आहेत का, त्याची खात्री करून घेतों.'

"लगेच मीं चौधरीबाबूंच्या दफ्तरांत फोन केला. सुदैवानें ते तिथेंच होते. धनामलजींना घेऊन कांहीं तांतडीच्या कामाकरितां मी लगेच येत असल्याचं त्यांना सांगितलं.

"मी फोन करीत असतां धनामलजी आपल्या तिजोरींतील कांहीं कागद काढून ते मुरारीला समजून देत होते. 'चौधरीबाबू आपली वाट पाहात आहेत.' असं मीं सांगतांच ते म्हणाले, 'वाः उत्तम. चला, आपण निघूं या.'

"मग लगेच आम्ही चौधरीबाबूंच्या ऑफिसांत गेलों. मुरारी बरोबरच होता. तिथें धनामलजींनीं चौधरीबाबूंकडून मुरारीच्या नांवाची 'परप्रो' तयार करून घेतली व आपण त्यावर सही करून त्याची पुढील व्यवस्था करण्यास त्यांनाच सांगितलं.

"हें सारं होतां होतां पुरा एक तास गेला. तेव्हां धनामलजी लगबगीनें चौधरीबाबूंना म्हणाले, 'सॉलिसिटरबाबूजी, मी आतां हृषीकेशला जात आहें. तिथेंच कायमचा राहाणार. मुरारीवर लक्ष ठेवा. अजून तो बच्चा आहे.'

"आमचे सॉलिसिटर चौधरी म्हणजे पक्के रुक्ष. कायद्याच्या भाषेसारखेच अगदीं नीरस. पण त्यांनाही धनामलजींनीं केलेली ही निरवानिरव पाहून गहिंवरून आलं. त्यांनीं मोठ्या कष्टानें धनामलजींना निरोप दिला.

"आतां तुफान मेल सुटायला फक्त तीस मिनिटांचा अवधि होता. तेव्हां चौधरीबाबूंच्या दफ्तरांतून बाहेर पडतांना मीं धनामलजींना म्हटलं, 'धनामलजी, वेळ फार थोडा आहे. पुलावर ट्रॅफिक जाम असेल, तेव्हां गाडी मिळणं मुष्किल आहे. चला, घाई केली पाहिजे.'

"धनामलजींनीं नुसती मान डोलवली आणि आम्ही घाईघाईनें त्यांच्या मोटरींत बसलों. मुरारीचे डोळे अजून ओलेच होते. पण धनामलजींच्या चेहऱ्यावर मात्र मुळींही चलबिचल दिसत नव्हती. ते अगदीं शांत होते.

"गाडींत बसतांच ते ड्रायव्हरला म्हणाले, 'चंदू, प्रथम राधाकिशनजींच्या मंदिराकडे गाडी घे. दर्शन घेऊन मग पुढं स्टेशनवर जाऊं.'

"धनामलजी कलकत्त्यांत असले, म्हणजे राधाकृष्णाच्या मंदिरांत जाऊन दर्शन घेतलं नाहीं, असं त्यांच्या उभ्या आयुष्यांत कधीं घडलं नव्हतं. तेव्हां गाडी चुकण्याची वेळ आली असतांही त्यांनीं वाटेंत राधाकृष्णाला जावं, यांत मला मुळींच आश्चर्य वाटलं नाहीं.

"राधाकृष्णाचं दर्शन घेऊन आम्ही घाईघाईनें हावड्याला आलों. सुदैवानें पुलावर फारशी गर्दी नव्हती.

"जगदीश स्टेशनवर बाहेरच आमची वाट पाहात उभा होता. त्याच्या पाठोपाठ आम्ही प्लॅटफॉर्मवर जाऊन धनामलजींच्या डब्यापाशीं गेलों. तिथें धनामलजींना निरोप देण्यासाठीं मुरारीची बायको, मुलं व इतर कांहीं स्नेही आधींच आलेले होते. सर्वांचे चेहरे म्लान होते.

"धनामलजींना पाहातांच सुनेनें त्यांच्या पायांवर डोकं ठेवलं. मुलं धनामलजींना बिलगलीं. मुरारीला आतां भडभडून आलं

होतं. गाडी सुटायला ५–६ मिनिटंच बाकी होतीं. तेव्हां मीं धनामलजींचा हात धरून त्यांना त्यांच्या डब्यांत बसवलं. मुरारी मागोमाग आंत आला. भावनांचा उद्रेक दाबून, धनामलजींच्या पायांवर डोकं ठेवून तो त्यांना म्हणाला, 'पिताजी, आजवर आपलं छत्र होतं; त्यामुळें आम्ही सारीं निर्धास्त होतों. पण आतां आमचं कसं होणार ?'

"धनामलजी लेकाच्या पाठीवरून हात फिरवीत म्हणाले, 'बेटा, काळजी करूं नकोस. राधाकिशनजींचं छत्र तुझ्यावर अबाधित आहे. विश्वास असूं दे.'

"हें ऐकून मुरारी म्हणाला, 'होय पिताजी, तो तर आहेच. पण हल्लींच्या ह्या बिकट परिस्थितींत आतां हा धंदा कसा चालेल ? आजपर्यंत अडीअडचणींतून सल्ला द्यायला आपण होतांत. आतां मी कुणाकडे सल्ल्यासाठीं जाऊं ?'

"धनामलजी लेकाला आश्वासन देत म्हणाले, 'बेटा मुरारी, तूं शहाणा आहेस, लायक आहेस, धंद्यांतल्या साऱ्या गोष्टींत निपुण आहेस. मी तुला फक्त एकच गोष्ट सांगतों, ती नीट ध्यानांत ठेव. काळाबाजार करावाच लागला, तर तो आपद्धर्म म्हणून कर. त्याबद्दल कधीं फुशारकी तर मारूं नकोसच, पण उलट तो करण्याची लाज वाटूं दे. आणि काळाबाजार करून गबर होण्याची तर कधींच हाव बाळगूं नकोस. अशी वृत्ति बाळगलीस, तर त्यांतूनच तुला चांगला मार्ग दिसेल. भगवान तुझं भलं करो.'

"इतक्यांत गाडीची शिटी झाली आणि सर्वांनीं मोठ्या कष्टानें धनामलजींचा निरोप घेतला." असें म्हणून सुरेनबाबूंनीं आपलें तोंड रुमालानें पुसलें. त्यांचे डोळे ओलावलेले होते.

एक सुस्कारा टाकून ते पुढें म्हणाले, "साहाब, ही काल संध्याकाळची हकीकत. रात्रभर मला झोप आली नाहीं. कुणाजवळ तरी मन मोकळं केल्याशिवाय बरं वाटणार नाहीं, म्हणून हा सकाळींच तुमच्याकडे आलों."

सुरेनबाबूंच्या खांद्यावर हात ठेवीत मीं म्हटलें, "बाबूजी, बरं केलंत आलांत तें. परमेश्वराची लीला अगाध आहे. खरं ना !"

* *

काळाबाजार, लांचलुचपत व नाना प्रकारचे अन्य खोटे व्यवहार आज भारतांत बेधडक चालू आहेत. ते करण्याची आपल्याला लाज वाटूं लागणार नाहीं तोंपर्यंत ते बंद होण्याची आशा बाळगणें व्यर्थ आहे.

## उत्सवांचा खटाटोप

"सज्जनगडावरील हवेपेक्षां चाफळची हवा चांगली, असें सांगून शिष्यांनीं चाफळ येथें जाण्याचा आग्रह केला, परंतु चाफळला आपली समाधि झाल्यास शिष्यमंडळी आपल्या पुण्यतिथीचा उत्सव तेथें करतील व त्यामुळें श्रीरघुपतीची अमर्यादा होईल, ह्या विचारानें समर्थांनीं चाफळला जाण्याचें नाकारलें."—श्रीसमर्थ-चरित्र,आजगांवकर, पृष्ठ १०४

आराध्यदेवतेची अमर्यादा होऊं नये म्हणून रामदासस्वामींनीं केवढी दक्षता घेतली !

आणि आज ? आज आपण आराध्य-देवतांना अजिबात गुंडाळून ठेवून आपले स्वतःचेच उत्सव अहमहमिकेनें साजरे करण्याच्या खटाटोपांत आहोंत !

# सेवेसीं श्रुत होय

ॐ नमोजी आद्या । वेद प्रतिपाद्या ।
जयजय स्वसंवेद्या । आत्मरूपा॥

ईश्वरीकृपेनें 'सद्धर्म' त्रैमासिकाला आतां तिसरें वर्ष लागत आहे. त्रैमासिकाचें कार्य असेंच चालू ठेवण्यास परमेश्वरानें आम्हांला सामर्थ्य द्यावें, अशी प्रार्थना आहे.

दुष्प्रवृत्तींच्या लाटा आतां भारतवर्षांत इतक्या वेगानें उसळूं लागल्या आहेत, कीं त्यांच्या कल्लोळापुढें सत्प्रवृत्तींचा प्रसार करणें तर बाजूलाच राहिलें, पण त्यांना नुसतें तगवून धरणें हेंही दिवसेंदिवस अशक्यप्राय होत चाललें आहे. पण परमेश्वराची लीला अगम्य आहे. ह्यांतूनही तो भारताला मार्ग दाखवील. प्रयत्नांची शिकस्त करणें हें आपलें कर्तव्य आहे.

वर्गणीदारांना प्रसारासाठीं अधिक अंक धाडण्याला आम्ही गेल्याच्या मागल्या अंकापासून सुरुवात केली. त्या वेळीं वर्गणीदारांची संख्या ६६५ होती. आतां ह्या अंकाच्या वेळीं, म्हणजे अवघ्या सहा महिन्यांत ती ९४० वर गेली आहे. अधिक धाडलेला अंक आपल्या स्नेह्यां-सुहृदांस देऊन, वर्गणीदारांनीं 'सद्धर्मा'चा जो आस्थेनें प्रसार केला, त्याचेंच हें दृश्य फळ आहे. त्यांच्या ह्या सहकार्याबद्दल त्यांना आमचें कृतज्ञतापूर्वक अभिवादन आहे.

ह्या अंकासमवेतही आम्ही मागीलप्रमाणें एक अधिक अंक धाडत आहों. तो त्यांनीं इतरांस द्यावा; तद्वत् 'सद्धर्म' आवडेल अशा आपल्या माहितीच्या कांहीं सद्गृहस्थांचीं नांवें त्यांच्या पूर्ण पत्त्यासह त्यांनीं आम्हांला कळवावीं, अशी आमची सर्वांस नम्र विनंती आहे. त्या पत्त्यांवर आम्ही 'सद्धर्मा'चे नमुना अंक विनामूल्य धाडीत जाऊं. अगदीं अज्ञात ठिकाणीं अंक धाडण्यापेक्षां ज्ञात जागीं धाडलेले अंकच परिणामकारक होतात.

कांहीं वर्गणीदारांकडून १९६७ ची म्हणजे दुसऱ्या वर्षाची वर्गणी आलेली नाहीं. ती त्यांनीं धाडावी व सर्वांनीं १९६८ चीही धाडावी अशी विनंती आहे.

सर्वांना लोभ असावा, हेंचि दान देगा देवा.

## संक्रांतीला 'सद्धर्म' वांटा

संक्रांतीच्या हळदीकुंकवाच्या वेळीं ज्या कांहीं ल्हानसहान वस्तु यायकांना वांटण्यांत येतात, त्यांऐवजीं गेल्या सालीं आमच्या एका सुविद्य भगिनीनें 'सद्धर्मा'चे अंक वांटले होते. बऱ्याच बायकांना ती कल्पना अभिनव वाटून पसंतही पडली.

यंदा कोणाला त्याप्रमाणें संक्रांतीच्या घरगुती हळदीकुंकवाच्या प्रसंगीं 'सद्धर्मा'चे अंक वांटावे अशी इच्छा असेल, त्यांनीं आम्हांला तावडतोब लिहावें. अवश्य तितके जानेवारी १९६८ चे अंक आम्ही बुकपोस्टानें विनामूल्य धाडून देऊं.

अंक मागवतांना आपला वर्गणीदार क्रमांक अवश्य कळवावा, म्हणजे अंक धाडणें सुलभ होईल. पत्रें १० जानेवारीपूर्वीं यावीत.

मुद्रक : मोहन ग. शिराळी, मोहन मुद्रणालय, शिवडी बंदर रोड, शिवडी (पूर्व) मुंबई १५ डीडी
प्रकाशक : बा. ग. ढवळे, कर्नाटक प्रकाशन संस्था, कर्नाटक हाउस, गिरगांव, मुंबई २ बीबार